## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

बाबांचा मिळूनी आधार
असा आला आत्मविश्वास
ओह छोटासा मनीप्लांट
होईल त्याचा वृक्ष बहारदार ॥धृ॥

आधी येत शंका मनी
काम होणार की नाही
बाबांनी करुन खंबीर मन माझे असे
दिला ठाम विश्वास
काम होणार होणार
यश मिळणार मिळणार ॥ 1 ॥

आहे बाबांची मी बाहुली
नाजुक छोटी ईवलीशी
होऊन दाखवीन तुम्हा सर्व गोष्टीत पारंगत
अशी दणकट बळकट
हात लावण्या घाबरतील सर्व
तरी बाबांचरणी नम्र ॥ 2 ॥

आहेत निर्गुण निराकार
अव्यय अविनाशी माझे बाबा
नाही ऐकून घेणार मी जर कोणी बोले बाबा
करीन त्याचा पाणउतारा
मग नका करु माझा त्रागा ॥ 3 ॥

★★★★★